**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA**
**PHONE :EPABX- 2609000, (Inquiry Cell) 2609143, (EST) 2609097, 98, 99**
**FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स)2609000, (चौकशी कक्ष), 2609143 (राष्ट्रीय सेवा योजना),2609176
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333

**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**


सदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे दिनाक : 07/01/2020

प्रति,

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य / प्राचार्या,<br>शिवाजी विद्यापीठ संलग्न<br>सर्व राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालये,<br>कोल्हापूर शहर | मा. अधिविभागप्रमुख,<br>सर्व राष्ट्रीय सेवा योजना संलग्न अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

**विषय : कोल्हापूर शहर स्वच्छ सर्वेक्षण व स्वच्छता उपक्रमामधील सहभागाविषयी........**

महोदय / महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना द्वारे वेळोवेळी विविध कार्यक्रम / उपक्रम तथा शिबीरांचे आयोजन करण्यात येते. वरील विषयास अनुसरून कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर तसेच प्राचार्य संघ, कोल्हापूर यांची मा. महानगरपालिका आयुक्त यांचे दालनामध्ये संपन्न झालेल्या एकत्रित बैठकीतील निर्देशान्वये कोल्हापूर शहरातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालये / अधिविभाग यांनी स्वच्छता सर्वेक्षण 2020 या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेणे अत्यावश्यक आहे.

सदर उपक्रमामध्ये सहभागी होणेकरीता यासोबत जोडण्यात आलेल्या माहिती पत्राचे अवलोकन करून **https://swachhsurvekshan2020.org/CitizenFeedback या लिंकवर त्याप्रमाणे कार्यवाही करणेसह आपल्या महाविद्यालय / अधिविभाग यांचेद्वारे आपल्या महाविद्यालय नजीकचा परीसर यांसह बगीचा, पुतळा, प्राचीन स्मारक यांची प्रत्येक सुट्टीच्या दिवशी (महिन्यातील किमान 4 रविवार) राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या सहभागाने स्वच्छता करावीत. आपणाद्वारे करण्यात येणा–या कामाचे कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर तसेच प्राचार्य संघ, कोल्हापूर यांचेमार्फत परीक्षण करण्यात येणार असून उत्तम कार्य केलेल्या महाविद्यालयास उत्कृष्ठ स्वच्छता कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानित करून गौरविण्यात येणार आहे**.

तरी सदर स्वच्छता अभियान उपक्रमामध्ये सहभागी होणेकरीता वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसह खालीलप्रमाणे नमूद कोष्टकातील माहिती त्वरीत nss@unishivaji.ac.in या ई–मेलवर पाठविण्यात यावी ही विनंती.

| | |
|---|---|
| महाविद्यालयाचे / अधिविभागाचे नाव | |
| महाविद्यालयाचा पत्ता | |
| कार्यक्रम अधिकारी नाव | |
| कार्यक्रम अधिकारी संपर्क | |
| स्वच्छता उपक्रमाकरीता निवडलेले स्थळ / परिसर (नाव व पत्ता यासह) | |

कळावे,

सोबत – संबंधित माहितीपत्र..

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ. डी. के. गायकवाड)
प्र–संचालक, रा.से.यो.

D:\SUBMISSION 2015-16\CIRCULAR – University Letter Head - Pg.741

कोल्हापूर महानगरपालिका
आरोग्य घनकचरा व्यवस्थापन विभाग

स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० अंतर्गत आपले शहरातील नागरीकांना आपले शहराविषयी प्रतिक्रिया नोंदविणेकरिता लिंक उपलब्ध करुन दिलेली आहे. कोल्हापूर शहरातील सर्व नागरीकांनी उपलब्ध करुन दिलेला लिंकचा वापर करुन आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात. यामध्ये सकारात्मक प्रतिक्रिया नोंद केलेस शहरातील स्वच्छ सर्व्हेक्षण संबधित गुणांकन मध्ये वाढ होणार आहे. तरी सर्वांनी खालील प्रमाणे लिंकव्दारे सकारात्मक प्रतिक्रिया नोंदवुन कोल्हापूर शहरास जास्तीत जास्त गुणांकन मिळवुन देणेस सहकार्य करावे.

https://swachhsurvekshan2020.org/CitizenFeedback

↓

हि लिंक ओपन करावी

↓

आपले राज्य – जिल्हा- शहर निवडावे

↓

येणारे प्रश्नाची उत्तरे होय नमुद करावे

↓

नंतर ओ.टी पी साठी दुसरा मोबाईल नंबर व नाव नमुद करावे.

↓

proceed

विचारणेत येणारे ८ प्रश्नाची उत्तरे

↓

प्रश्न १ तुमचे शहर स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० मध्ये सहभागी आहे का याबाबत तुम्हास माहीती आहे का ?
उत्तर - होय
प्रश्न २ तुम्ही तुमचे शहरास स्वच्छतेसंबधित किती गुण देवू शकाल

उत्तर - १०

प्रश्न ३ व्यापारी व सार्वजनिक क्षेत्रातील स्वच्छतेसंबधित तुम्ही किती गुण दयाल

उत्तर - १०

प्रश्न ४ महानगरपालिकेचे कर्मचारी तुम्हास ओला व सुका कचरा वेग वेगळा देणेकरिता सांगतात का

उत्तर yes, always

प्रश्न ५ तुमचे शहरांचे रस्त्याचे दुभाजक वर झाडे लावणेत आलेली आहे का

उत्तर yes, all roads all dividers

प्रश्न ६ सार्वजनिक व सामुदायिक शौचालयाकरिता तुम्ही किती गुण दयाल

उत्तर १०

प्रश्न ७ तुमचे शहराचे हागणदारीमुक्त सद्यस्थितबाबत तुम्हास माहीती आहे का

उत्तर yes, its declared and certified

प्रश्न ८ तुमचे शहाराचे कचरा मुक्त शहर सद्यस्थितबाबत तुम्हास माहीती आहे का

उत्तर yes, its 3 star

याप्रमाणे प्रतिसाद दिलेस कोल्हापूर शहरास स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० मध्ये चांगले गुण प्राप्त होणार आहेत तरी सर्व शहरवासीयांनी वरीलप्रमाणे आपला प्रतिसाद नोंदवावा असे आवाहन कोल्हापूर महानगरपालिकेचे वतीने करण्यात येत आहे.

# कोल्हापूर महानगरपालिका
## आरोग्य विभाग
## स्वच्छ सर्वेक्षण २०२०

प्रिय, नगरवासियांनो

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविणेत येत असून या अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेने अत्यंत प्रभावीपणे कामगिरी करुन कोल्हापूर महानगरपालिका हागणदारीमुक्त करुन महाराष्ट्रामध्ये अवल स्थान प्राप्त करुन कोल्हापूर शहर नावलौकिक केले आहे. यामध्ये आपले सर्व नगरवासियांचे बहुमौल्य सहकार्य लाभलेले आहे. आता कोल्हापूर महानगरपालिका शुन्य कचरा ही संकल्पना साकारलेली असून त्याकरीता आपले सहकार्याची अत्यंत गरज आहे.

जरा इकडे लक्ष द्या ।

फक्त दोन मिनिटे वेळ द्या. आपले घरातील रोजचा निर्माण होणारा कचरा ओला व सुका अशा पध्दतीने वर्गीकरण करुन दोन स्वतंत्र कचरापेटी (डस्टबिन्स) मध्ये साठवून ठेवा. स्वतंत्र साठवणूक केलेला कचरा स्वरुपातच मनपा घंटागाडी / टिपरकडे सुपुर्द करावा.

ओला कचरा :– स्वयंपाक घरातील कचरा, शिजवलेले अन्न/न शिजवलेले अन्न, फळे आणि फुलांचा कचरा, गळलेली पाने इत्यादी स्वरुपाचा कुजनारा कचरा

सुका कचरा :– प्लॅस्टिक, लाकुड, धातु, फायबर, रबर, थर्माकॉल, इत्यादी स्वरुपाचा न कुजणारा कचरा

वरीलप्रमाणे निर्माण होणारा कचरा वेगळ्या स्वरुपात वर्गीकरण करून दोन स्वतंत्र कचरा पेटी (डस्टबिन्स) मध्ये साठवून मनपाच्या घंटागाडीकडे देणेत यावा.

तसेच भारत स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अनुषंगाने सर्व नागरीकांना खालीलप्रमाणे माहीती असणे अत्यंत आवश्यक आहे.



१. होय, आमचे शहर स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये सहभागी आहे.
२. होय, माझे शहर अधिक हिरवेगार स्वच्छ व सुंदर आहे.
३. होय, शहरातील परिसर स्वच्छतेस माझे गुण २०० पैकी २००आहे.
४. होय, माझे शहराने odf++ दर्जा व थ्री स्टार मानांकन मिळवले आहे.
५. शहरातील व्यावसायिक व सार्वजनिक परिसर आता अधिक स्वच्छ सुंदर व हरित आहे यास माझे गुण २०० पैकी २०० आहे.
६. होय, महापालिकेमार्फत कर्मचारी आम्हाला ओला व सुका कचरा नेहमी वेगळा देण्यास सांगतात.
७. सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छता गृहांच्या स्वच्छतेस माझे गुण २०० पैकी २०० आहेत.

आपले शहरात स्वच्छ सर्वेक्षण समितीमार्फत वरीलप्रमाणे प्रश्न विचारलेनंतर त्यांचे उत्तर होय देवून महानगरपालिकेस स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये अव्वलस्थान येणेस प्रत्येक नागरीकांनी हातभार लावावा व आपला परिसर स्वच्छ ठेवून महानगरपालिकेस सहकार्य करावे.

! स्वच्छ कोल्हापूर सुंदर कोल्हापूर !

**आयुक्त**
कोल्हापूर महानगरपालिका

**महापौर**
कोल्हापूर महानगरपालिका